# सायबर सुरक्षेसंदर्भात चाळकवाडीत जागृती

**पिंपळवंडी :** चाळकवाडीच्या (ता. जुन्नर) शिवांजली विद्यानिकेतन विद्यालयात विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षेसंदर्भात जागृती व्हावी, या उद्देशाने मार्गदर्शन शिबिर घेण्यात आले. क्विक हिल फाउंडेशनसोबत सुरू झालेल्या 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या अभियानांतर्गत आळे (ता. जुन्नर) येथील बी. जे महाविद्यालयातील बीसीए विभागातील विद्यार्थ्यांनी शिवांजली विद्यानिकेतनच्या इयत्ता पाचवी ते दहावीच्या सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत सायबर सुरक्षेची गरज अधोरेखित केली.मोबाईलचा वापर करत असताना इंटरनेट व सायबर सुरक्षितता व सतर्क राहणे किती गरजेचे असते, यावर उदाहरणासह मार्गदर्शन केले. याप्रसंगी उपशिक्षक अशोक कुऱ्हाडे, संतोष चव्हाण, प्रशांत शेटे, मुख्याध्यापक भानुदास चासकर उपस्थित होते. बी जे महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना क्विक हिल फाउंडेशनच्या माध्यमातून एक चांगली संधी प्राप्त झाल्याचे मुख्याध्यापक चासकर यांनी सांगितले. तसेच फाउंडेशन व बी.जे. महाविद्यालयाचे आभार मानले. कार्यक्रमाच्या आयोजनात बंडू सदामते, विष्णू बोरसे, कमल शिरोळे, आशा पानसरे, अण्णासाहेब घुले, चंद्रकांत साळवे, महेश कुऱ्हाडे आदींसह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहभागी झाले होते. साक्षी नेहरकर, शोएब शेख, मोहिनी जगताप, ऋतू नेहरकर यांनी समन्वयक म्हणून जबाबदारी पार पाडली.